MHOS130002652005

**<u>नि.दि.दा.क्र.१४२/२००५</u>**

**<u>अनिल वि. दत्तात्रय</u>**

**<u>निशाणी क्र.१०९ च्या अर्जावरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मयत वादी क्र.२ संतोष बाळकृष्ण साबळे यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होऊन मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे, वादी क्र.२ संतोष बाळकृष्ण साबळे हे दि.२०/०८/२०१९ रोजी मयत झालेले आहेत. वादी यांनी वादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर घेण्याचा मुदतीत अर्ज देणे आवश्यक होते. परंतु वादी क्र.२ च्या मृत्यूनंतर वादी क्र.२ च्या वारसांना सदर प्रकरणाबाबत काहीही माहिती नसल्याने व कोरोना आजाराच्या साथीमुळे व वादी क्र.१ हा अत्यंत आजारी असल्यामुळे वादी यांना मयत वादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याचा अर्ज देण्यास साधारणत: ५ वर्षे, ५ महिने २० दिवस विलंब झाला आहे. त्यामुळे सदर प्रकरणात वादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर न घेतल्यामुळे दावा वादी क्र.२ चे विरुध्द ॲबेट झाला आहे व त्याच कारणामुळे वादीस ॲबेटमेंट रद्द करणेकामी अर्ज देण्यास विलंब झाला आहे. वादी हे आज रोजी प्रस्तुत अर्जासोबत वादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याचा अर्ज देत आहे. म्हणुन कोर्टाने विलंब माफ करून वादी क्र.२ यांचे झालेले ॲबेटमेंट रद्द करणे योग्य व न्याय्य आहे. विलंब माफ न केल्यास वादी यांचे कधीही पैशात न भरुन येणारे नुकसार होणार आहे. तसेच प्रस्तुत प्रकरण हेस्थावर मिळकतीचे असल्यामुळे वादी यांना त्यांच्या न्याय्य हक्कापासून वंचित व्हावे लागेल.

**०३.** प्रतिवादी क्र.१ यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला आहे

**०४.** दोन्ही विधिज्ञांना सविस्तर ऐकले. अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा स्थावर मिळकतीचे असल्यामुळे कायम मनाई हुकुम व खरेदीखत रद्द करुन मिळणेबाबत दाखल करण्यांत आलेला आहे. त्यामुळे मयत वादी क्र.२ संतोष बाळकृष्ण साबळे यांच्या मृत्युनंतर देखील सदरचा दावा चालविण्याचा वारसाचा अधिकार हा टिकून राहतो (Right to sue). त्यामुळे मयत वादी क्र.२ संतोष बाळकृष्ण साबळे यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर आणण्याची आवश्यक कार्यवाही करणे गरजेचे आहे. असे न केल्यास वादीचा प्रस्तुत दावा हा गुणवत्तेवर चालू शकणार नाही. परंतु, त्याचबरोबर अर्जदारांमुळे प्रकरणास झालेला विलंब लक्षात घेणे गरजेचे आहे. त्यामुळे सर्व कारणाचा विचार करुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज (नि.क्र.१०९) रुपये **५००/–** खर्चाची अटीवर मयत वादी क्र.२ संतोष बाळकृष्ण साबळे यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यांत येत आहे.

AMRAPALI BABURAO JONDHALE
Digitally signed by AMRAPALI BABURAO JONDHALE
Date: 2025.08.08 17:35:49 +0530

दिनांक : ०८.०८.२०२५

( **श्रीमती ए. बी. जोंधळे**)

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भूम.

**प्रमाणपत्र**

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. न्यायनिर्णय /आदेश यामधील सर्व मजकुर मुळ न्यायनिर्णय /आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | एस.एस.हिंगमिरे, लघुलेखक ग्रेड–३ |
| न्यायालयाचे नाव | : | सह दिवाणी न्यायालय क. स्तर, भूम,<br>ता. भूम, जि. उस्मानाबाद. |
| आदेश दिनांक | : | ०८.०८.२०२५ |
| आदेशावर पिठासिन अधिकारी<br>यांनी स्वाक्षरी केलेचा दिनांक | : | ०८.०८.२०२५ |
| आदेश अपलोड केलेचा दिनांक | : | ०८.०८.२०२५ |